# ज्योतिर्मय

Online Journal of Literature.... साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ३४ वा ❑ भारतीय सौर दिनांक २१ फाल्गुन शके १९४७, गुरूवार दि.१२ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पदवी यूपीएससी साठी ग्राह्य...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना नाशिक येथे स १ जुलै १९८९ मध्ये झाली.शिक्षण न घेऊ शकणाऱ्यांसाठी ‘‘ज्ञानगंगा घरोघरी‘‘ पोहोचवणारे प्रमुख राज्य मुक्त विद्यापीठ म्हणून अगदी अल्प काळात या विद्यापीठाने लौकिक मिळवला आहे . हे भारतातील ५ वे मुक्त विद्यापीठ असून, या विद्यापीठातून व्यावसायिक आणि सामान्य अभ्यासक्रम सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे हे विद्यापीठ मान्यताप्राप्त असून डिजिटल युगात या विद्यापीठाने कौशल्य-आधारित शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करून दिले आहे. विशेष म्हणजे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले घेतलेल्या उमेदवारांना यूपीएससी व एमपीएससी ची परीक्षा देखील देता येते. अनेक उमेदवारांनी या विद्यापीठातून पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन यूपीएससी व एमपीएससी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करून अनेक महत्त्वाच्या प्रशासकीय पदांवर त्यांची नियुक्ती झालेली आहे.

हे विद्यापीठ सामान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल किंवा नोकरी सांभाळून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी प्रदान करते. हे विद्यापीठ ग्रामीण व नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षणाद्वारे उच्च पदवी घेण्याची संधी देते.

पदवीच्या शेवटच्या वर्षाचे विद्यार्थीही परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. च्या पदव्या , आणि इतर सर्व स्पर्धा परीक्षांसाठी ग्राह्य धरल्या जातात.अंतिम वर्षाचे विद्यार्थी जर मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी घेत असतील तर ते यूपीएससी प्रिलिम्ससाठी.अर्ज करू शकतात व परीक्षेला बसू शकतात. प्रिलिम्स अर्जादरम्यान, तुम्हाला फक्त तुम्ही अंतिम वर्षात आहात हे घोषित करावे लागेल आणि नंतर उत्तीर्ण झाल्याचा पुरावा द्यावा लागतो.

नुकत्याच लागलेल्या युपीएससी परीक्षेच्या निकालात वर्धा जिल्ह्यातील कारंजा घाडगे तालुक्यातील ठाणेगाव येथील प्रज्वल धनराज नासरे याने घरीच ऑनलाईन अभ्यास करून तिसऱ्या प्रयत्नात देशात ६७७ वा रँक प्राप्त करत यशाला गवसणी घातली आहे प्रज्वलने बीए व एम ए यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून केले. प्रज्वलने पहिली ते पाचवी पर्यंत शिक्षण इंग्लिश मीडियम मधून केले बारावी पर्यंतचे शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय शेलु काटे येथून केले त्यानंतर त्याने मुक्त विद्यापीठातून शिक्षण पूर्ण करत यूपीएससी देशातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेत उज्वल यश मिळवले.

या आधी कोल्हापूरचे हेमराज पाणोरेकर यांनी मुक्त विद्यापीठातून बी.ए. करत, कोणत्याही मोठ्या कोचिंगशिवाय घरी अभ्यास करून २०२४ मध्ये ९२२ वा रँक मिळवला.

यूपीएससी परीक्षेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे यश हे नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. या विद्यापीठाची पदवी द्वारे मान्यताप्राप्त असल्याने, इथले अनेक विद्यार्थी प्रशासकीय सेवांमध्ये उच्च पदे मिळवत आहेत. मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी देखील यूपीएससी परीक्षेसाठी पूर्णपणे पात्र असतात.

यूपीएससीमध्ये चमकलेल्या काही प्रमुख विद्यार्थ्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे यशस्वी विद्यार्थी प्रदीप गायकवाड: त्यांनी मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेऊन यूपीएससी परीक्षेत यश मिळवले आणि ते सध्या आयपीएस अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

सत्यजित तांबे: त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीसोबतच मुक्त विद्यापीठातून पदवी पूर्ण केली असून, अशा प्रतिष्ठित विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याचा अभिमान वेळोवेळी व्यक्त केला आहे.

प्रशासकीय सेवेतील अन्य यश: केवळ यूपीएससीच नाही, तर एमपीएससी परीक्षेतही या विद्यापीठाच्या हजारो विद्यार्थ्यांनी यश मिळवून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार आणि पोलीस उपनिरीक्षक अशी पदे भूषवली आहेत.

विद्यापीठाच्या यशाची कारणे

सर्वसमावेशक शिक्षण: हे विद्यापीठ गृहिणी, शेतमजूर, कामगार आणि अगदी बंदिजनांनाही (कैदी) उच्च शिक्षणाची संधी देते.

अभ्यासक्रमाची रचना: यूपीएससी आणि स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने या विद्यापीठाचा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त मानला जातो.

कायदेशीर मान्यता: विद्यापीठाची पदवी राज्यातील इतर वैधानिक विद्यापीठांच्या पदवीशी समतुल्य आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्ये कोणतीही अडचण येत नाही.

# लोककवी वामनदादा कर्डक यांच्या स्मारकाचे भूमीपूजन संपन्न

## लोककवी वामनदादा कर्डक यांचे स्मारक पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल-केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

ज्योतिर्मय साहित्य

नाशिक - लोककवी वामनदादा कर्डक हे केवळ कवी नव्हते, तर ते समाजजागृती करणारे प्रभावी विचारवंत होते. त्यांनी आपल्या काव्य आणि गीतांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता, बंधुता आणि न्यायाच्या विचारांचा प्रसार केला. त्यांच्या गीतांनी समाजात आत्मविश्वास निर्माण करीत सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा दिली, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.



आज सिन्नर तालुक्यातील देशवंडी येथे लोककवी वामनदादा कर्डक यांच्या स्मारकाच्या भूमीपूजन कार्यक्रम प्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री श्री. आठवले बोलत होते. यावेळी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, खासदार राजाभाऊ वाजे, माजीमंत्री आमदार ॲड. माणिकराव कोकाटे, समाज कल्याण विभागाच्या आयुक्त दिपा मुधोळ-मुंढे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त देविदास नांदगावकर, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, लोककवी वामनदादा कर्डक यांचे कुटुंबीय, माजी महापौर पुणे विराज जैन, सरपंच उज्वला बारके, माजी सरपंच दत्ता डोमाडे यांच्यासह अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोककवी वामनदादा कर्डक यांच्या काव्यातून समाजातील वंचित, पीडित घटकांच्या वेदना आणि समतेचा संदेश प्रभावीपणे मांडला गेला, वामनदादा कर्डक यांच्या स्मृती जतन करण्यासाठी त्यांच्या जन्मगावी उभारण्यात येणारे स्मारक पुढील पिढ्यांना प्रेरणा देणारे ठरेल. या स्मारकाच्या माध्यमातून वामनदादा यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला होईल, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील अन्यायाविरुद्ध लढा देत महाड येथे चवदार तळे सत्याग्रह करून समानतेचा लढा उभारला. त्यांच्या विचारांमुळे भारतीय संविधानाने सर्व धर्म, जाती आणि समाजघटकांना समान न्याय देण्याची भूमिका स्पष्ट केली असल्याचे राज्यमंत्री आठवले यांनी सांगितले.

लोककवी वामनदादा कर्डक यांनी आपल्या शाहिरी, गीतांमधून आणि लेखणीतून बहुजन समाजात आत्मसन्मान व सामाजिक जागृतीची ज्योत प्रज्वलित केली. त्यांच्या विचारांचे स्मरण पुढील पिढ्यांपर्यंत राहावे आणि समाजप्रबोधनाची परंपरा अधिक बळकट व्हावी, यासाठी देशवंडी येथे भव्य स्मारक उभारण्यात येत असून हे स्मारक समाजासाठी प्रेरणास्थान ठरेल, असे प्रतिपादन मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

यावेळी मंत्री दादाजी भुसे, मंत्री संजय शिरसाट

खासदार राजाभाऊ वाजे व आमदार माणिकाराव कोकाटे यांनीही मनोगत व्यक्त केले. समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंढे यांनी प्रास्ताविकातून कवी वामनदादा कर्डक यांच्या कार्याची महती अधोरेखित केली. कार्यक्रमात मालेगावची कन्या प्रेरणा खवळे यांचा स्पर्धा परिक्षेतील योगदानाबद्दल व प्रसाद दिघोळे यांचा तिसऱ्या आशियाई युवा क्रिडा स्पर्धेत कब्बडी स्पर्धा प्रकारात सुवर्ण पदक मिळविल्याबाबत सत्कार करण्यात आला. तसेच लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कुटुंबियांचा व जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कारही यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार सहायक आयुक्त श्री नांदगांवकर यांनी मानले.


कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते स्मारकाच्या कोनशिलेचे अनावरण करून भूमीपूजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत सुमारे १३ कोटी ६७ लाख रुपये खर्च करून हे स्मारक उभारण्यात येत आहे. स्मारकासाठी एकूण २१ एकर जागा उपलब्ध झाली असून त्यापैकी ५६ गुंठे जागेवर मुख्य वास्तूचे बांधकाम करण्यात येणार आहे.

# स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कठोर कारवाई हवी, पण मकोका टाळावा

ज्योतिर्मय साहित्य

स्त्री भ्रूणहत्या थांबवण्यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज सर्वांनाच मान्य आहे. मात्र अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करताना समाजहित, आरोग्य व्यवस्था आणि न्याय्यतेचा समतोल राखणे तेवढेच महत्त्वाचे ठरते. कोणतीही कारवाई करताना तिचा व्यापक सामाजिक आणि आरोग्य व्यवस्थेवर होणारा परिणामही लक्षात घेणे आवश्यक आहे. मोका सारखा कायदा लागू केल्यास, गैरवापर होण्याचा धोका अधिक आहे.

स्त्री भ्रूणहत्या ही आपल्या समाजातील अत्यंत गंभीर समस्या आहे. मुलगी वाचवणे आणि समाजातील लिंग गुणोत्तर संतुलित ठेवणे ही केवळ शासनाचीच नव्हे तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. या उद्देशानेच पीसीपीएनडीटी कायदा लागू करण्यात आला. इंडियन मेडिकल असोसिएशनने नेहमीच या कायद्याच्या उद्दिष्टांना पाठिंबा दिला आहे. मुलगी वाचवा, मुलगी शिकवा अशा सामाजिक उपक्रमांना डॉक्टरांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे. स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी समाजात जागृती निर्माण करण्यासाठी वैद्यकीय क्षेत्र सातत्याने प्रयत्न करत आले आहे. त्यामुळे स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कठोर कारवाई होणे आवश्यक आहे याबाबत वैद्यकीय क्षेत्रात कोणतेही मतभेद नाहीत. जाणीवपूर्वक बेकायदेशीर लिंग निर्धारण करणाऱ्या रॅकेट्सवर कडक कारवाई झालीच पाहिजे. अशा गुन्ह्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठिंबा दिला जाऊ शकत नाही.



तथापि, पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यान काही बाबींचा संतुलित विचार करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पीसीपीएनडीटी अंतर्गत आढळणाऱ्या सर्व प्रकारच्या त्रुटींना संघटित गुन्हेगारीच्या कक्षेत ठेवणे योग्य ठरणार नाही.

**डॉ. अनुपम टाकळकर**
अध्यक्ष
इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर

मकोका हा कायदा मूळतः संघटित गुन्हेगारी टोळ्या, खंडणी, माफिया कारवाया आणि गंभीर गुन्हेगारी नेटवर्क यांच्यावर कारवाई करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. अशा प्रकारचा कठोर कायदा वैद्यकीय क्षेत्राशी जोडण्याबाबत गंभीर विचार करण्याची गरज आहे.

फौजदारी न्यायव्यवस्थेतील एक मूलभूत तत्त्व असे सांगते की शिक्षेची तीव्रता ही गुन्ह्याच्या गंभीरतेशी सुसंगत असावी. पीसीपीएनडीटी अंतर्गत अनेक प्रकरणांमध्ये आढळणाऱ्या त्रुटी या प्रत्यक्ष लिंग निर्धारणाशी संबंधित नसतात. त्या अनेकदा कागदपत्रांमधील तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक त्रुटी असतात. विशेषतः मधील लिपिकीय चुका अनेकदा गुन्हा म्हणून नोंदवल्या जातात. अशा त्रुटींना संघटित गुन्हेगारीच्या कायद्याखाली आणणे हे प्रमाणबद्धतेच्या तत्त्वाशी सुसंगत राहणार नाही.

पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान काही ठिकाणी प्रशासकीय अधिकारांचा अतिवापर झाल्याच्या तक्रारीही विविध स्तरावरून समोर आल्या आहेत. किरकोळ कागदपत्रीय त्रुटींवर सोनोग्राफी मशीन सील करणे, नोंदणी निलंबित करणे किंवा थेट फौजदारी कारवाई करणे यामुळे प्रामाणिक डॉक्टरांमध्ये अस्वस्थता निर्माण होते.

अत्यंत कठोर आणि दंडात्मक कारवाईचा परिणाम असा होऊ शकतो की डॉक्टर संरक्षणात्मक किंवा बचावात्मक वैद्यकीय पद्धती अवलंबू लागतात. अनेक डॉक्टर प्रसूतीपूर्व सोनोग्राफी सेवा देणे टाळू शकतात. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागात याचे परिणाम अधिक गंभीर असू शकतात. गर्भवती महिलांना आवश्यक तपासण्या वेळेवर मिळणे कठीण होऊ शकते. परिणामी मातामृत्यूदर आणि बालमृत्यूदर वाढण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

सार्वजनिक आरोग्य धोरणे प्रभावी होण्यासाठी शासन आणि वैद्यकीय क्षेत्र यांच्यात विश्वास आणि सहकार्य असणे अत्यंत आवश्यक आहे. डॉक्टरांना संभाव्य गुन्हेगार म्हणून पाहण्याऐवजी सार्वजनिक आरोग्याच्या भागीदार म्हणून सहभागी करणे अधिक परिणामकारक ठरेल.

स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी शासनाने जाणीवपूर्वक लिंग निर्धारण करणाऱ्या रॅकेट्सवर लक्ष केंद्रित करणे अत्यंत गरजेचे आहे. अशा गुन्ह्यांचा शोध घेण्यासाठी डमी रुग्णांच्या माध्यमातून विशेष तपास मोहिमा राबविणे हा एक प्रभावी मार्ग ठरू शकतो. ठोस पुराव्यावर आधारित कारवाई केल्यास खरे गुन्हेगार निश्चितपणे समोर येऊ शकतात आणि त्यांच्यावर कठोर कारवाई होऊ शकते. त्याचबरोबर कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये प्रक्रियात्मक त्रुटी आणि हेतुपुरस्सर गुन्हे यामध्ये स्पष्ट भेद ठेवणे आवश्यक आहे. नोंदींसाठी अधिक सुलभ डिजिटल प्रणाली विकसित केल्यास लिपिकीय त्रुटी मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकतात. किरकोळ प्रक्रियात्मक त्रुटींसाठी टप्प्याटप्प्याने दंडात्मक तरतुदी ठेवण्याचा विचार केला जाऊ शकतो. तसेच डॉक्टर आणि प्रशासन यांच्यात नियमित मार्गदर्शन व संवादाची यंत्रणा निर्माण करणेही महत्त्वाचे आहे.

स्त्री भ्रूणहत्येच्या मूळ सामाजिक कारणांवर काम करणे हीही तितकीच महत्त्वाची बाब आहे. समाजात मुलीबद्दलचा दृष्टिकोन सकारात्मक होण्यासाठी व्यापक जनजागृती, शिक्षण आणि लिंग समानतेवर आधारित सामाजिक मोहिमा राबविणे आवश्यक आहे. मुलगी वाचवा, मुलगी शिकवा हा संदेश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचला पाहिजे.

स्त्री भ्रूणहत्या रोखणे हे निःसंशयपणे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. मात्र त्या उद्दिष्टासाठी राबविण्यात येणारी सार्वजनिक धोरणे न्याय्य, प्रमाणबद्ध आणि आरोग्य व्यवस्थेच्या वास्तवाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. खऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, परंतु त्याच वेळी प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांवर अनावश्यक गुन्हेगारीकरण होणार नाही याचीही काळजी घेणे आवश्यक आहे.

समाज, शासन आणि वैद्यकीय क्षेत्र या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे काम केले तरच स्त्री भ्रूणहत्येसारख्या गंभीर सामाजिक समस्येवर प्रभावी आणि दीर्घकालीन उपाय शोधता येऊ शकतो.



## एक 'मदत' अशीही...
## त्यांना गमावलेले दोन्ही हात परत मिळतील

दिनांक 30/10/2025 रोजी दुपारच्या वेळी वरळी येथील जीवनदायी भवन मध्ये काम करत बसलेलो असताना आपेगाव ता.अंबाजोगाई जि.बीड येथील हरिदास विठ्ठलराव करडे नावाची व्यक्ती माझ्यासमोर येऊन उभा ठाकली. विजेचा जबरदस्त शॉक लागल्याने त्यांचे दोन्ही हात निकामी झाले आहेत. छोटेसे किराणा दुकान व ट्रॅक्टर यावर कुटुंबाची गुजरान चाले मात्र दोन्ही हात काम करण्याच्या क्षमतेचे राहिले नसल्याने जगावे कसे ? असा यक्ष प्रश्न त्यांच्यासमोर होता. इतर रुग्णांप्रमाणे त्यांना उपचारासाठी मदत नको होती तर गमावलेले हात बसवून स्वाभिमानाने जगण्याची धडपड होती.

मी अध्यक्ष असलेल्या आयुष्मान भारत योजनेत हे प्रकरण बसत नसल्यामुळे मी त्यांना मदत करणे शक्य नव्हते. मात्र 'साहेब, केवळ तुम्हीच माझी मदत करू शकता याचा मला विश्वास असल्याने मी इथपर्यंत आलो आहे' असे त्यांनी सांगितले. मी अनेकांना वेगवेगळ्या ट्रस्टच्या माध्यमातून मदत केली असल्याची आठवण सुद्धा त्यांनी मला करून दिली. नेमके याच वेळी गडचिरोली येथील लॉयड कंपनीचे विक्रम मेहता (निवृत्त लेफ्ट. कर्नल) काही कामानिमित्त माझ्याकडे आलेले होते ते म्हणाले की, ' सर, तुम्ही म्हणत असाल तर मी काही आर्थिक मदत करून योगदान देऊ शकतो.' मग माझाही आत्मविश्वास वाढला, मी करडे यांना मदत करण्याचा शब्द दिला. मात्र दहा लाख रुपयांची व्यवस्था करणे सोपे काम नव्हते.

नेहमीप्रमाणे टाटा ट्रस्टच्या कार्यकारी संचालकांना फोन करून करडे यांना हाताचे प्रत्यारोपण करण्यासाठी आर्थिक मदत करण्याची विनंती केली. त्यांनी तावडतोब ती मान्य करून पाच लाख रुपयांची मदत पाठवून दिली. मात्र तेवढ्याने भागत नसल्यामुळे मी माझे मित्र तथा मुंबई रोटरी चे एक्स गव्हर्नर डॉ. राजेंद्र अग्रवाल यांच्याकडे मदतीची अपेक्षा व्यक्त केली. त्यांनीही क्षणाचा विलंब लागू न देता माझ्या विनंतीला मान दिला.

आज नेहरू सेंटर ऑडिटोरियम, वरळी मुंबई. येथे अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाच्या व्यासपीठावर अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाचे राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष मा.डॉ.राजेंद्र अग्रवाल यांच्या पुढाकाराने व संजयजी तिबेतवाला यांच्या दातृत्वाने पाच लक्ष रुपयांची देणगी सुपूर्द करण्यात आली.

के ई एम हॉस्पिटल मुंबई मधील डिपार्टमेंट ऑफ प्लास्टिक सर्जरी यांचे प्रतिनिधी डॉ.मोहन भोसले यांनी मदतीचा धनादेश स्वीकारला. देशातील प्रतिथयश व नामवंत कवी यांची यावेळी उपस्थिती होती. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाचे सदस्य मा.अशोक जिंदाल, श्रीमती अपर्णा अग्रवाल, डॉ.सुदीप गुप्ता, नरेंद्र अग्रवाल, अनिल काशी मुरारका, अशोक छाजर आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

हाथ प्रत्यारोपण करण्याची अभूतपूर्व शस्त्रक्रिया के ई एम रूग्णालयात प्रथमता: होते आहे. कृत्रिम नाही तर देहदान किंवा मेंदू मृत अवस्थेत असलेल्या व्यक्तीचे अवयव दान केल्यानंतर सजीव हाताचे प्रत्यारोपण केले जाते. मात्र ही शस्त्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची असते. भारत देशामध्ये अशा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नुकत्याच सुरू झालेल्या आहेत. के ई एम शासकीय रुग्णालयातील कदाचित ही पहीली शस्त्रक्रिया असेल. हरिदास करडे यांना हात प्रत्यारोपण करण्यासाठी लागणारा निधी अवघ्या चार महिन्यात मिळवून देण्यात यशस्वी झालो. दिव्यांगांना स्वाभिमानाचं आयुष्य जगता यावे आणि त्यांना धैर्य,चिकाटी, प्रेरणा मिळावी यासाठी मी नेहमीच आग्रही असतो. एकंदरीत माझ्या प्रामाणिक प्रयत्नाला यश आले आहे. आजपर्यंत रुग्णांना उपचार मिळविण्यासाठी ज्यांना ज्यांना शब्द टाकला त्यांनी तो खाली पडू दिला नाही. मात्र आज हात गमावलेल्या व्यक्तीला परत त्याचे हात मिळणार आहेत ही आगळी वेगळी गोष्ट आहे. जेंव्हा करडे यांना नवे हात बसतील तेंव्हा त्यांच्या व कुटुंबीयांच्या डोळ्यात दिसणारा आनंद व समाधान हीच माझी खरी कमाई आहे. जे करायचे ते लोकांच्या चेहऱ्यावरील आनंद व समाधानासाठी, हीच तर आम्हाला शिकवण आहे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेबांची...!

**डॉ. ओमप्रकाश शेटे**
(अध्यक्ष - आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती, महाराष्ट्र शासन)




## जात्यावरच्या ओव्या......

मायबाप आठवता
डोळे भरून आले
आम्हा करून पोरक
कहुन देवाघरी गेले? ||५३८||

मायबाप आठवता
आसु ओघळले गाली
लेकीबाळीला आधार
मया आंधळी पांगळी ||५३९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक – भाग ५





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

श्रीरामांनी जीवनात संयमाला स्थान दिले आणि मर्यादांचे पालन केले म्हणूनच ते मर्यादा पुरुषोत्तम आहेत. रावण विद्वान होता, शूर होता, ज्ञानी होता पण तो विकारांना बळी पडला आणि त्यामुळे त्याचे अध:पतन झाले. आपण संयमाची मूर्ती असलेल्या आणि मर्यादापुरुषोत्तम असलेल्या श्रीरामांचे पूजन करतो, रावणाचे नाही. म्हणूनच विषयांची कल्पना देखील नको असे समर्थ म्हणतात.

आपल्यासारख्या सामान्य आणि संसारी माणसाच्या मनात साहजिकच प्रश्न येईल की मग विषय भोगायचेच नाहीत का? जीवनाचा आनंद घ्यायचा नाही का ? अशा प्रसंगी श्रीरामांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवावा. श्रीरामांनी जीवनाचा आनंद घेतला परंतु त्यासाठी धर्माने जी मर्यादा आखून दिली आहे, तिचे त्यांनी पालन केले. म्हणून आपल्या धर्मात, संस्कृतीत जे मान्य असेल त्याचा संयमितपणे उपभोग आपण घेऊ शकतो. आणि ते करत असताना सत्यसंकल्पाकडे म्हणजे परमेश्वराच्या प्राप्तीकडे आपली वाटचाल करू शकतो. हल्ली जग जवळ आले आहे. द वर्ल्ड इज अ ग्लोबल व्हिलेज असं आपण म्हणतो. पण प्रत्येक देशाच्या चालीरीती, संस्कृती निराळी असते. ते पाहिल्यानंतर आपल्याकडील नीतिमत्तेच्या कल्पना आपल्याला चुकीच्या वाटू शकतात. परंतु जिथे जसे वागणे योग्य असते तसेच वागायला हवे. इतर ठिकाणी अमुक अमुक गोष्ट मान्य आहे म्हणून आपण इकडेही तसं करायला काय हरकत आहे असा सोयीस्कर विचार आपल्या मनात येऊ शकतो. कारण मनाची धाव विषयांकडेच असते. पण ती गोष्ट आपल्या धर्मात, संस्कृतीत किंवा नीतिमत्तेच्या कल्पनेत बसते का याचा विचार करायला हवा. असतो मा सद्गमय, तमसो मा ज्योतिर्गमय अशी आपली वाटचाल जीवनामध्ये असले पाहिजे. हेच या ठिकाणी समर्थांना सांगायचे आहे.



संकल्प जसा असेल, तसे जीवन घडते. म्हणून समर्थ प्रथम मनाला शुद्ध करण्याचा आग्रह धरतात. मन शुद्ध झाले की मार्ग आपोआप प्रकाशमान होतो; सत्यसंकल्पातूनच श्रेयसाचा प्रवास सुरू होतो.

स्वसंवाद :

माझ्या मनात वारंवार येणारे विचार कोणत्या प्रकारचे असतात ?

मी जाणीवपूर्वक सत्यसंकल्प करून तो पाळण्याचा प्रयत्न करतो का ?


माझे विचार, शब्द आणि कृती यांमध्ये सुसंगती आहे का?

विषयांच्या आकर्षणामुळे मी कधी माझ्या मूल्यांशी तडजोड करतो का?

माझ्या जीवनसंकल्पाची दिशा केवळ यशाकडे आहे की मानसिक आणि अध्यात्मिक उन्नतीकडेही ?

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

संतांच्या ग्रंथामध्ये अनंताला गवसणी घालण्याचे सामर्थ्य असते. त्यातील अंतरंग समजून घेतले तर आपल्यातली संशयी वृत्ती नष्ट होते. आत्मस्वरूप जागे होते. सामान्य माणसाचे लोभी स्वार्थी, आत्मकेंद्री, अहंकारी, वासनांनी परिपूर्ण जीवन पूर्णपणे बदलते.

संतसाहित्याचा अभ्यास केला तर आपल्या कल्पनाशक्तिच्या जोरावर आपण प्रभुशी एकरूप होतो.

ग्रंथाचे वाचन किंवा लिखाण करत असताना लहानपणी जेव्हा आपल्याला आई *गमभन* शिकवते. तसा ग्रंथांचा आधार घेऊन संत आपल्या जवळ बसले आहेत ते हात धरून लिहायला उद्युक्त करत आहेत. असा भास होतो.

ग्रंथातील शब्दांच्या आधारावर लेखकाला अतींद्रिय, अव्यय, अव्यक्त अनंत सुख अनुभवायला मिळते.

ग्रंथ कसा असावा

ग्रंथ आपल्या अंतरंगात खोल परिणाम करणारा असावा, अध्यात्मिक प्रगती व्हावी सर्वज्ञ होण्याची क्षमता निर्माण व्हावी.

ग्रंथामध्ये तर्कसंगत शास्त्रशुध्द विवेचन असावे.


वाचकांचा विवेक जागृत व्हावा. स्वार्थी, अहंकारी जीवनाला मुठमाती मिळालेली असावी. वाचताना आपले मन, विचार अन एकंदरीत हृदय सर्व अंतर्बाह्य बदलून गेले पाहिजे.

पण वाचकाने काही नियम पाळले पाहिजेत.

१) श्रवणभक्ति मनापासून करावी

२)काही गोष्टी आपल्या मनाचं समाधान करत नाहीत पण केवळ अट्टाहास धरल्याने समाधान भंग पावते म्हणून अट्टाहास करू नये.आणि आपल्यातला निश्चय संपवू नये. समाधानाची भावना निर्माण होते ज्यामुळे आपल्या अंतरंगात प्रभूची प्रतिमा जागृत होत असते. तेव्हा न पटणा-या वाक्याला चिकटून बसू नये. काही गोष्टी सोडून द्यायला शिकावे. (क्रमशः)

## नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, 'मुलाचे प्रेम कसे येईल?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा, ' मुलाचे प्रेम कसे येईल ' हा प्रश्न करण्याऐवजी, 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर ' नामाचे प्रेम कसे येईल ' असा करण्याऐवजी, ' मुखी नाम कसे येईल ' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वत:चीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरुवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वत:चाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, ' प्रेम का येत नाही ? ', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, ' नाम घेत नाही म्हणून. ' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण ' प्रेम का येत नाही ? ', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वत:ला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे.

आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात ' मिळविण्यापेक्षा ' मिळविलेले ' टिकविणे ', हेच जास्त कठीण आहे. ज्याला ' मी काही तरी झालो ' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

### ♦दिवस तिसरा♦

पुढे......

सदचीदानंदरूपाय.. श्रीकृष्णाय वयं नमः
हा मंगलाचरणाचा श्लोक आहे. समाप्तीची, पूर्णतेच्या ज्याला कामना आहेत त्याने मंगलाचरण करावे. असे श्रुती सांगते.

आपण जे काम करतो त्यामागे भगवतांचे आशीर्वाद असावेत. कार्यात त्याचे अधिष्ठान असावे. म्हणून भगवंताचे स्मरण वंदन करून आपण काम सुरू करतो.

आपण एखाद्याला मी हे करतो असे एकदा म्हणालो की तो संकल्प आकाशातील देवता ऐकत असतात. मी एखाद्याला जर म्हणालो की, मी उद्या त्याला 4 वाजता पैसे देतो तर तेही देवता ऐकतात त्या आपला संकल्प पूर्ण व्हावा म्हणून आशीर्वाद द्यायला तयार असतात. म्हणून आपणही पैसे परत करायला वेळेवर गेलेच पाहिजे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत मंगलाचरण केले आहे. ज्ञानोबरायांचे हात कोणते कार्य करण्यास समर्थ नव्हते? तुकोबांनी मेलेले मूल जिवंत केले होते. त्यांना कोणता प्रतिबंध होता? भिंत चालावी असा नुसता संकल्प करायचा अवकाश होता. भिंत चालायला सुरुवात झाली.

संकल्प आणि त्यासाठी परिपूर्ती यातील अंतर कष्टाने भरून काढणे हे जीवाचे लक्षण आहे. संतानी संकल्प केला की लगेच त्याची परिपूर्ती यात विलंब नसतो, कष्ट नसतात.क्षणात त्याची परिपूर्ती झाली.ज्ञानोबा,तुकोबा हे कर्तूम अकर्तुम व अन्यथा कर्तूम सामर्थ्याचे धणी होते.

कार्याची उपस्थिती नसताना ते करता येते याला कर्तूम सामर्थ्य म्हणतात.

सगळी कारण परंपरा असूनही ते घडू न देणे याला अकर्तुम सामर्थ्य म्हणतात.(पाऊस ढग भरलेले असूनही न पडू देणे. संत म्हणाले आज पाऊस पडायचा वाण आहे, पण आज पडणार नाही.)

शिष्ट संप्रदाय म्हणजे मोठ्या माणसांनी घालून दिलेल्या मार्गाने जाणे. उर्वरित उद्या पहा...




## पोट साफ ठेवा आणि रोगमुक्त व्हा

ज्योतिर्मय साहित्य

नियमित पोट साफ न झाल्यास १०० पेक्षा जास्त आजार होतात. आवश्य काळजी घ्या.

उपाय -----

१) पेरुच्या बीया न चावता पेरू खा. (पेरूच्या फोडींवर काळीमिरी पावडर + थोडे मीठ टाका)

किंवा रात्री झोपण्यापूर्वी १-२ तयार केळी खा. किंवा तयार पपई खा. अगर कच्चा पपई भाजी करून खा.

२) कोरफड रस घ्या. पतंजलित मिळतो.

३) रात्री झोपण्यापूर्वी पाच - सहा दिवस त्रिफळा चुर्ण घ्या. (एक लहान चमचा त्रिफळा चुर्ण कोमट पाण्यातून घ्या.) किंवा

४) सम प्रमाणात दूध + पाणी घ्या.

५) गरज असेल तरच रात्री जेवण घ्या किंवा हालका आहार घ्या.

६) नियमित प्राणायाम, योगासने व सूर्यनमस्कार घालणे.

७) जेवणापूर्वी जे कच्चे खाता येईल ते कच्चेच खा. (गाजर, बीट, कांदा, काकडी, टोमॅटो, मोड आलेले मुग, मटकी, हरभरे, शेंगदाणे इ.) नंतर जेवण घ्या.

८) फायबरयुक्त अन्नपदार्थ खा. मात्र जेवणा पूर्वीच खा. जेवणानंतर खाऊ नका.

९) मांसाहार / मैदा पदार्थ टाळा. (मैदा म्हणजे अन्नातिल फेव्हीकोल होय.)

१०) मोड आलेले कडधान्य सालीसह खा. पावटे सुद्धा न सोलता खा.

११) टॉयलेटला बसल्यावर श्वास रोखून हाताने (चवडा) हनुवटी घासा / प्रेस करा. पोट लवकर साफ होते. हा ऍक्युप्रेशरचा चांगला उपाय आहे.

१२) सकाळी अनोशापोटी १-२ ग्लास कोमट/गरम पाणी प्या.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

१३) होल व्हीट ब्रेड (गव्हाचा ब्रेड) खा.

१४) मेथी दाणे एक लहान चमचा + पाणी रात्री झोपण्यापूर्वी गिळा. दाणे फुगून मलाचे खडे न होता विघटन होते.

१५) झोपण्यापूर्वी १ पेला कोमट दुध + देशी गाईचे तुप एक चमचा मिक्स करून प्या. तसेच जेवणामध्ये तुप खाणे. चांगला फायदा होतो. पोट लवकर साफ होते. तुपाने शरीर आतुन नरम राहते. चरबी वाढत नाही. कोलेस्टेरॉल वाढत नाही.

१६) नियमित सकाळी ५ ते ६ या वेळेतच ऊठा आणि  ला जाणे. कारण सकाळी शरीरात वायूचा प्रभाव जास्त असल्याने पोट लवकर साफ होते.

१७) एकाचवेळी सर्व उपाय करू नका. १८) पोट साफ होणारे उपाय कायमस्वरूपी करू नका. अशक्तपणा येईल. हाडे ठिसूळ होतील.

१९) व्यसनांपासून चार हात लांबच रहा. नाहीतर पोट बिघडेल.

२०) एकाचवेळी भरपेट खाण्यापेक्षा भूक लागेल तसे थोडे थोडे भरपूर चावून खा. पोट साफ राहण्यास मदत होते.

२१) नैसर्गिक जीवन जगा. कोणतेच औषध घ्यावे लागणार नाही.

सगळेच उपाय एकाच वेळी करु नयेत.

## आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





### ♦विक्रम वेताळ : कथा तिसरी♦

खूप पूर्वी एका समृद्ध राज्यात एक पराक्रमी राजा राज्य करत होता. त्या राजाला एक कन्या होती. ती अत्यंत सुंदर, बुद्धिमान आणि गुणी होती. तिच्या सौंदर्याची आणि चातुर्याची कीर्ती दूरदूर पसरली होती. अनेक राजकुमार तिच्याशी विवाह करण्यासाठी उत्सुक होते.

राजकन्या मात्र सामान्य नव्हती. तिने ठरवले होते की तिचा विवाह फक्त अशा पुरुषाशी होईल जो खरोखर धैर्यवान, बुद्धिमान आणि कर्तव्यनिष्ठ असेल.
त्यामुळे अनेक इच्छुकांपैकी तीन तरुण तिच्या जीवनात विशेष ठरले.
पहिला तरुण अत्यंत शूर आणि पराक्रमी होता. युद्धकौशल्य आणि धाडस यासाठी तो प्रसिद्ध होता.
दुसरा तरुण अत्यंत बुद्धिमान होता. संकटसमयी उपाय शोधण्यात तो कुशल होता.
तिसरा तरुण दूरदृष्टी असलेला आणि विचारपूर्वक योजना करणारा होता.
एके दिवशी राजकन्या मंदिरात दर्शनासाठी गेली असताना अचानक एक भयंकर राक्षस तिला पळवून घेऊन गेला. संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. राजा चिंतेत पडला. राजकन्येला वाचवण्यासाठी अनेक सैनिक पाठवले गेले, पण कोणीही यशस्वी झाले नाही.
त्या वेळी हे तीन तरुण पुढे आले.
तिसऱ्या तरुणाने आपल्या दूरदृष्टीचा उपयोग करून राक्षस कुठे राहतो याचा शोध लावला. त्याने माहिती गोळा केली आणि योग्य योजना आखली.
दुसऱ्या तरुणाने आपल्या बुद्धीचा उपयोग करून राक्षसाला पराभूत करण्याचा मार्ग शोधला. त्याने सांगितले की राक्षसाला थेट सामोरे जाण्याऐवजी युक्ती वापरावी लागेल.
मात्र जेव्हा प्रत्यक्ष राक्षसासमोर उभे राहण्याची वेळ आली, तेव्हा पहिल्या तरुणाने धैर्याने पुढे येत तलवार उचलली. त्याने राक्षसाशी प्रखर युद्ध केले. मोठ्या पराक्रमाने त्याने राक्षसाचा वध केला आणि राजकन्येला सुरक्षितपणे परत आणले.
राजकन्या सुरक्षितपणे परत आली. राज्यात आनंद साजरा झाला. पण आता एक नवीन प्रश्न उभा राहिला. उर्वरित उद्याच्या अंकात......

# भारतीय अर्थव्यवस्थेच्या अभ्युदयात स्त्रीशक्तीचा सिंहाचा वाटा-डॉ. वि ल धारूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**


बावधन / पुणे - भारतीय अर्थव्यवस्थेच्या अभ्युदयात स्त्री शक्तीचा सिंहाचा वाटा आहे भारत जगामध्ये तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनत आहे तो स्त्री शक्तीच्या योगदानामुळेच असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत आणि माजी कुलगुरू डॉक्टर विल धारूरकर यांनी केले. ते सावरकर प्रभात शाखेच्या साप्ताहिक बौद्धिक वर्गात बोलत होते, अध्यक्षस्थानी जेष्ठ कार्यकर्ते अनिल फौजदार हे होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मेरी लँड परिसरात भरणाऱ्या शाखेमध्ये बोलताना डॉ. धारूरकर पुढे म्हणाले स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण तंत्रज्ञान उद्योग तसेच कृषी संशोधन, अंतराळ संशोधन आरोग्य सेवा इत्यादी क्षेत्रात महिलांनी मोठे योगदान दिले आहे.

आपल्या भाषणामध्ये डॉ. धारूरकर यांनी महिला दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केली ते म्हणाले १९०८ रोजी न्यूयॉर्क शहरातील पंधरा हजार महिलांनी कामाचे तास कमी करावेत योग्य वेतन द्यावे या मागण्यासाठी मोठा मोर्चा काढला. महिलांनी संघटितपणे केलेली ही पहिली लढाई होती, त्यामुळे आंतरराष्ट्रीय महिला दिवस हा जागतिक पातळीवर या दिवसाची आठवण म्हणून साजरा केला जातो. माझे योग्य ता, योग्य वेतन आणि प्रत्येक महिलेला मतदानाचा अधिकार द्यावा या मागणीसाठी हे आंदोलन होते.

आपल्या भाषणात डॉ. धारूरकर पुढे म्हणाले हा सारा इतिहास संघर्षाचा आहे समर्पणाचा आहे. १९०८ ते ११ दरम्यान प्रगमनशील चळवळी मधून उदयास आलेला पहिला राष्ट्रीय महिला दिवस १९०९ मध्ये आयोजित करण्यात आला होता

१९१० मध्ये कलारा झेटकीण यांनी कामगार महिलांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत असा दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. पहिला आंतरराष्ट्रीय कार्यक्रम १९११ मध्ये ऑस्ट्रेलिया डेन्मार्क आणि स्विझरलँड मध्ये तसेच जर्मनीत आयोजित करण्यात आला होता. १९१७ मध्ये रशियन महिला फेब्रुवारीच्या शेवटच्या रविवारी जो ८ मार्च रोजी येतो त्या दिवशी ब्रेड अँड पीस साठी प्रसिद्ध संप घडवून आणला १९७५ ते ७७ या काळात संयुक्त राष्ट्रांमध्ये या चळवळीस पाठिंबा मिळाला १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला दिवस आठ मार्च रोजी साजरा करण्याचा प्रस्ताव अधिकृतपणे मान्य करण्यात आला आणि तो सर्व सदस्य राष्ट्रांनी स्वीकारला. या वर्षाच्या अधिकृत उद्देशाचे महत्त्व सांगताना ते म्हणाले गिव्ह टू गेम काही मिळवण्यासाठी समर्पण हे या घोषवाक्याचे महत्त्वाचे सूत्र आहे तसेच महिलांच्या विकासासाठी समर्थन देण्याची आवाहन याद्वारे करण्यात आले आहे. महिलांना समाजामध्ये मानसन्मान, आदरभाव प्राप्त व्हावा म्हणून या



दिवशी लोक जागृती घडविले जाते परीक साचेबद्ध पारंपरिक सनातनी आव्हानांना तोंड देऊन स्त्रीमुक्तीची चळवळ पुढे जात आहे. त्यामुळे महिलांचे हक्क न्याय आणि कृती कार्यक्रम यावर भर देऊन महिलांच्या विकासाची चळवळ पुढे नेली पाहिजे कारण महिलांचा समग्र विकास हा शाश्वत विकासाचा पाया होय असेही डॉ धारूरकर म्हणाले

सबंध जगामध्ये कुटुंब कल्याण आणि पर्यावरण रक्षणात भारतीय महिलांचा वाटा सर्वात महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागात कुटुंबांचे संगोपन करण्यात आणि सर्व आर्थिक सेवांमध्ये बचत घडविण्यात महिलांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. जरी पाश्चात्य देशाप्रमाणे भारतीय महिला नोकरीत नसल्या तरीही त्यांना त्यांच्या सेवाबद्दल दरमहा ८०० डॉलर्स एवढे सेवा कार्य म्हणून मानधन दिले पाहिजे. संरक्षण उत्पादन आणि भारताच्या औद्योगिक विकासाबरोबर राष्ट्रीय उत्पन्नात जशी वाढ होईल त्याप्रमाणे महिलांच्या विकासातील त्यांचा वाटा नित्यनेमाने दिला पाहिजे असेही सूत्र त्यांनी मांडले.

क्रीडा, संस्कृती, संगीत, चित्रपट तसेच मनोरंजन उद्योगातील सॉफ्ट पॉवर म्हणून भारताचा जो गतिमान उदय झाला आहे त्या उदयामध्ये सुद्धा महिलांचा वाटा सिंहाचा आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांच्या योगदानाची सिद्धांतिक मांडणी करताना डॉ धारूरकर पुढे म्हणाले की सूक्ष्म आणि स्थूल अशा दोन्ही अर्थव्यवस्थांना बळकटी देण्याचे कार्य महिलांमुळे शक्य झाले आहे. नरेंद्र मोदी युगात मात्र शक्ती वंदना विधेयक संमत झाल्यामुळे पुढील संसदेत महिलांचा बलशाली शक्ती म्हणून उदय होईल. आणि पुढील दशकात पुन्हा एकदा इंदिरा गांधी यांच्याप्रमाणेच महिला नेतृत्वाचा सक्रिय आणि अष्टपैलू उदय होईल, असेही सूत्र त्यांनी मांडले.

प्रारंभी अनिल फौजदार यांनी विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट केली त्यानंतर झालेल्या चर्चेमध्ये श्री विकास टिकेकर, लक्ष्मीनारायण वाजपेयी, राजीव भोपळे तसेच डॉ. उत्तरवार श्री दीक्षित सिंगविष्णूजी मिश्रा लिंबूवाले आणि श्री घोगरे यांनी भाग घेतला. शेवटी श्री विकास टिकेकर यांनी सर्वांचे आभार मानले.






## विक्रम वेताळ आणि डायरेक्ट मार्केटिंग

### इटीएफ आणि इंडेक्स फंड

विक्रमाने आपला हट्ट सोडला नाही, मौन धारण करून तो दलाल स्ट्रीटवर आला, झाडावर लटकत असलेले प्रेत त्यांने खांद्यावर टाकले व तो सोनापूराकडे चालू लागला.

विक्रमा, एक्सचेंज ट्रेडेड फंड (ETF) आणि इंडेक्स फंड मधे नेमका काय फरक आहे...आणि एखाद्याला इनव्हेस्टमेंट करायची असेल तर नेमका कुठला फंड चांगला असेल या विषयी आज मला माहिती दे.
विक्रमादित्याच्या चेहऱ्यावर एक स्मित पसरले... तो म्हणाला
"वेताळा म्युच्युअल फंड हा खुप मोठा विषय आहे तु रोज माझे मौन तोडण्या साठी एक नवा प्रश्न विचारतोस...मला तुझ्या ज्ञान जिज्ञासेचे कौतुक वाटते.. आणि म्हणुनच मी तुझ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देतो... इंडेक्स फंड म्हणजे काय हे मी या आधी पण एकदा सांगितले आहे तरी पुन्हा एकदा सांगतो..
आपले इंडेक्स आहेत जसे निफ्टी, सेन्सेक्स,बँक निफ्टी इत्यादी, या मधे इनव्हेस्टमेंट करणारे फंड म्हणजे इंडेक्स फंड...पण इथे हे इंडेक्स बेंचमार्क नाहीत हा,इथे त्यांची कॉपी करून तसा एक पोर्टफोलिओ बनवला जातो ज्या मधे इंडेक्स मध्ये असलेले सगळे स्टॉक्स त्यांच्या इंडेक्स मध्ये असलेल्या परसेंटेज प्रमाणे विकत घेतले जातात...इंडेक्स हाच बेस असल्याने इंडेक्स मध्ये जी मुव्हमेंट होईल तशीच मुव्हमेंट या फंडात पण होताना दिसते...म्हणजे वर्ष भरात जर इंडेक्स १४ टक्के वाढला तर त्या वर आधारित इंडेक्स फंड सुद्धा १४ टक्के रीटर्नस देईल.... असे फंड हे कंप्युटर च्या प्रोग्राम च्या आधारेच नियंत्रित केले जातात त्यामुळे या फंडांचा एक्सपेंस रेशो (खर्च) कमी असतो. उर्वरित उद्या वाचा......

# "बोल बोल राणी" १० जुलैला होणार प्रदर्शित

**ज्योतिर्मय साहित्य**

सिड विंचुरकर निर्मित, दिग्दर्शित 'बोल बोल राणी' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर झाली असून येत्या १० जुलै रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. सोशल मीडियावर प्रदर्शित झालेल्या काही सेकंदांच्या व्हिडिओमध्ये रहस्य आणि उत्सुकतेचं जबरदस्त मिश्रण पाहायला मिळतं. खुर्चीत बसलेली एक तरुणी, बांधलेले हात, पार्श्वभूमीला घोंगावणारं रहस्यमयी संगीत आणि बंदुकीतून सुटलेली गोळी या सगळ्यामुळे 'नेमकं घडलंय तरी काय?' असा प्रश्न प्रेक्षकांच्या मनात निर्माण होत आहे.

या व्हिडिओमुळे चित्रपटाच्या कथेबाबत कोणताही थेट उलगडा होत नसला, तरी त्यात दडलेली अस्वस्थ करणारी शांतता आणि थरारक वातावरण चित्रपट एका वेगळ्याच पातळीवर नेणार असल्याचं स्पष्ट होतं. विशेष म्हणजे पंधरा वर्षांनंतर सुबोध भावे, सई ताम्हणकर आणि चिन्मय मांडलेकर हे तीन दमदार कलाकार एकत्र झळकणार असल्यामुळे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. त्यांच्यासोबत संभाजी ससाणेही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

नेमकी ही मुलगी कोण? तिचे हात का बांधलेले आहेत? गोळी कुणासाठी आहे? आणि या सगळ्यामागे कोणतं सत्य दडलं आहे? या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी प्रेक्षक आतापासूनच चर्चेत रंगू लागले आहेत.



चित्रपटाबद्दल निर्माते, दिग्दर्शक सिड विंचुरकर म्हणतात, थ्रिलर म्हणजे फक्त भीती दाखवणं नाही, तर प्रेक्षकांच्या मनात प्रश्न निर्माण करणं आणि शेवटपर्यंत त्यांना अस्वस्थ ठेवणं. 'बोल बोल राणी'चा हा व्हिडीओ या प्रवासाचा पहिला टप्पा आहे. प्रत्येक आवाज, प्रत्येक शांतता आणि प्रत्येक दृश्यामागे एक अर्थ आहे. प्रेक्षकांनी हा थरार अनुभवण्यासाठी सज्ज राहावं.''

न्यूझिलंड मोशन पिक्चर्स आणि फिफ्टी टू फ्रायडे निर्मित या चित्रपटाचे अपूर्वा मोतीवाले सहाय, सिड विंचुरकर आणि अमित भानुशाली निर्माते आहेत. यश मोदी, शब्बीर सबुवाला, रचना वोरा सहनिर्माते असून तपन विचारे, यश राम शाहानी, आयुष कृप्लानी असोसिएट निर्माते आहेत. ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे या चित्रपटाला संगीत लाभले आहे. रहस्यमयी कथानक, तगडी स्टारकास्ट आणि वेगळ्या मांडणीमुळे 'बोल बोल राणी' हा चित्रपट सध्या चर्चेचा विषय बनत आहे.



## दूरदर्शन सह्याद्री वाहिनीच्या शब्दांच्या वाटेवर या विशेष कार्यक्रमात डॉ. नागेश अंकुश

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर मराठी भाषा गौरव दिनापासून 'शब्दांच्या वाटेवर' या साहित्यिक मुलाखतींच्या विशेष मालिका सुरू होत आहे. साहित्यिक गप्पांवर आधारित या कार्यक्रमात विविध लेखकांच्या जीवनप्रवासाचा आणि त्यांच्या साहित्याचा परिचय असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे.

ही विशेष मालिका दि. १२ मार्च २०२६ पासून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

या विशेष मालिकेत आपण प्रा.जयदेव डोळे - पत्रकार आणि भाषा अभ्यासक, बाबा भांड - साहित्यिक आणि प्रकाशक, प्रो. हंसराज जाधव - महानुभव साहित्याचे अभ्यासक, कौतिकराव ठाले पाटील - मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गणेश घुले - बालसाहित्य लेखक, राहुल कोसंबी - लेखक आणि समीक्षक, बाभूळगावकर बाबा शास्त्री -निरुपणकार, प्रो. संजय मोहोड - प्राध्यापक, दासू वैद्य - कवी, पी. विठ्ठल - कवी, शाहीर दामोदर वजीरगावकर, अस्लम मिर्झा, डॉ. दत्तात्रय डुंबरे - संत साहित्याचे अभ्यासक या मान्यवरांना भेटणार आहोत.

शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी रात्री ८.३० वाजता प्रसारित होणाऱ्या भागात भाषाभ्यासक डॉ. नागेश अंकुश यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

निर्माती वनिता गोंडाळ यांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. अभिनेत्री पूनम चांदोरकर यांनी सूत्रसंचालन केले.

'शब्दांच्या वाटेवर' या कार्यक्रमाचे शीर्षक गीत डॉ. नागेश अंकुश यांनी लिहिले असून, युवा गायिका युगंधरा केचे, (सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय) हिने गायले केले आहे. साहित्यप्रेमींसाठी ही मालिका निश्चितच पर्वणी ठरणार आहे.

# उन्नती सोशल फाउंडेशनचा महिला दिन उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - महिलांच्या भावविश्वातील सदाबहार गाणी, मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पत्रलेखन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे वितरण, समाजात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार सोहळा आणि सुग्रास भोजनाने उन्नती सोशल फाउंडेशनचा महिला दिन अत्यंत उत्साहात साजरा झाला. पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने सोमवार दि. ९ रोजी सायंकाळी या रंगारंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उन्नतीच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ दिपप्रज्वलनाने करण्यात आला. त्यानंतर भारती न्यायाधीश यांनी सादर केलेल्या मराठी - हिंदी भाषेतील सदाबहार गाण्यांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. दरम्यान समाजाच्या विविध क्षेत्रातील कार्यरत आणि कर्तृत्ववान महिलांचा उन्नती सोशल फाउंडेशनच्या संस्थापिका आणि भाजपा नगरसेविका कुंदा भिसे, प्रभागातील दुसऱ्या नगरसेविका अनिता काटे तसेच सपना काटे आणि उन्नती फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आला. यावेळी कुंदा भिसे यांनी , महिला दिनानिमित्त महिला सशक्तीकरणासाठी समाजातील सर्व घटकांनी




एकत्र येणे गरजेचे असून उन्नति सोशल फाऊंडेशन त्यासाठीच दरवर्षी हा उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात शेवटी पत्रलेखन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. सत्कार झालेल्या महिलांमध्ये गीतांजली जोशी, तेजश्री म्हैसाळे, शारदा मुंडे, डॉ. धनश्री सोनवणे, डॉ. रश्मी मोरे, डॉ. अश्विनी डरले, आम्रपाली शिंदे, शिखा तिवारी, भारती न्यायाधीश, शिल्पा आठल्ये, वसुधा गोडसे, हिमानी सुर्यवंशी, शायन्ती वाघमारे, सुनिता खानिकर, पार्वती रुडबुडे, अनुश्री मुळे, मनीषा मेहेंदळे, जया लोखंडे आदिंचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसुधा गोडसे यांनी केले. सुग्रास भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.







## हवामान शास्त्र: गारा का पडतात आणि शेतकऱ्यांनी काय दक्षता घ्यावी?

निसर्गाच्या अनेक रूपांपैकी 'गारपीट' हे एक असे रूप आहे जे जितके विलोभनीय वाटते, तितकेच ते शेतीसाठी घातक ठरते. एक कृषी उद्योजक आणि पदवीधर म्हणून यामागील वैज्ञानिक कारणे आणि व्यवस्थापन समजून घेणे काळाची गरज आहे.

■ १. गारांची निर्मिती - एक 'थर्मोडायनामिक' प्रक्रिया : जेव्हा उन्हाळ्याच्या शेवटी जमिनीलगतची हवा प्रचंड तापते, तेव्हा ती वेगाने वरच्या दिशेला ढकलली जाते. या हवेसोबत बाष्पही वर जाते.
ढगांची उंची: ही हवा जेव्हा १०-१५ किमी उंचीवर जाते, तेव्हा तिथे 'क्युम्युलोनिम्बस' नावाचे अवाढव्य ढग तयार होतात.
गोठण प्रक्रिया: या ढगांच्या वरच्या भागात तापमान -२०°C ते -४०°C असते. तिथे पाण्याचे थेंब गोठून त्याचे रूपांतर बर्फाच्या गोळ्यांत (गारा) होते.

■ २. गारांचा आकार का वाढतो? : ढगांच्या आत हवेचा प्रवाह इतका वेगवान असतो की, या गारा खाली पडण्याऐवजी पुन्हा पुन्हा वर फेकल्या जातात. प्रत्येक वेळी वर जाताना त्यांच्यावर पाण्याचे नवीन थर साचतात आणि ते गोठतात. गारांचा आकार जेवढा मोठा, तेवढा त्या ढगातील 'अपड्राफ्ट' (वर जाणारा हवेचा झोत) शक्तिशाली असतो.

■ ३. शेतीवर होणारे गंभीर परिणाम यांत्रिक इजा : गारांच्या प्रहारामुळे पिकांची पाने फाटतात, फांद्या मोडतात आणि फळांची मोठ्या प्रमाणावर गळ होते.

■ फळबागांचे नुकसान : आंबा, द्राक्ष, संत्रा आणि मोसंबी यांसारख्या फळबागांचे यामुळे 'क्वालिटी' आणि 'क्वांटिटी' अशा दोन्ही स्तरावर नुकसान होते.

■ दुय्यम संसर्ग : गारांमुळे झाडांना झालेल्या जखमांमधून बुरशीजन्य आणि जीवाणूजन्य रोगांचा (उदा. कॅन्कर, डाउनी मिल्ड्यू) प्रादुर्भाव वाढतो.

## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षांचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# मृदु व गोड स्वभावाच्या लेखिका सौ विभावरी लेले

**ज्योतिर्मय साहित्य**

विभावरी लेले ताईला भेटून, तिचा स्वभाव, तिचं व्यक्तिमत्व पाहून मला एक मराठी गाणं आठवलं, कारण विभावरी ताई तशीच चांदण्यासारखी हासरी आहे. ते गाणं म्हणजे...

चांदणे शिंपीत जाशी
चालता तू चंचले
ओंजळी उधळीत मोती
हासरी ताराफुलें....

हुबेहूब अगदी अशीच असणारी आमची सौ. विभावरी उदय लेले. तिच्या हास्याचे चांदणे शिंपीतच ती सतत पुढे पुढे जात असते. हास्याचे मोती उधळीत, आकाशीच्या चांदण्यासारखी चमकत असते. नाव सुद्धा कसं साजेस आहे ना !!!

विभावरी...चांदण्यांनी भारलेली रात्र. किती अप्रतिम, सुंदर आमच्या देखण्या विभाताईला शोभणारा तिच्या नावाचा अर्थ.

विभाताई खूप आनंदी हसरी, खेळकर स्वभावाची आहे. तशीच ती अत्यंत हुशार कर्तृत्ववान आहे. विभाताईचे शिक्षण बी एस सी. होम सायन्स,बृहद् गुजरात संगीत समितीचा गांधर्व महाविद्यालयाची शास्त्रीय गायनाची विशारद परीक्षा विषेश योग्यतेसह शिक्षण घेतलेली, विभाताई गुजरातची असल्याने तिने तिच्या पहिल्या प्रकाशित पुस्तकात गरबा, रस, भजन, थाल-भोग या प्रकारच्या विविध गुजराती गाण्यांच्या गीतांचा समावेश आहे. हे पुस्तक गुजरातीत लिहिले आहे. एकूण १०० गीत यात आहेत. या पुस्तकाचे नाव श्री लक्ष्मी गरबा भजनावली असे आहे.

दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकाशित पुस्तकात प्रत्येकी १००/१०० अश्या कविता, गीतं, पाळणे, वर्षा गीत असे गुजराती भाषेत प्रकाशित झाले आहे. त्यांची नावे अनुक्रमे ''श्री'' आणि ''अभिनंदन'' अशी आहेत.

अहं थांबा हं!!!

अजून मराठीत प्रकाशित झालेली पुस्तके आहेतच. वाचायला विसरू नका...

विभाताईचे चौथे पुस्तक मराठीत आहे, हो... हो. अगदी अस्खलित मराठी बोलते, आणि लिहिते सुद्धा.. तर या चौथ्या मराठी काव्यसंग्रहाचे नाव ''त्या लांब वसलेल्या गावात'' यात ६० मराठी कविता आहेत. त्यानंतर पाचवा काव्य संग्रहाचे नाव आहे, ''अविरत'' यात १२१ कविता प्रकाशित आहेत. अविरत म्हणजे



सतत अखंड, निरंतर अगदी तिच्या हसऱ्या स्वभावासारखे.

तिचं सहाव्या काव्यसंग्रहाचे नाव आहे ''विभावरी'' ज्यात १२१ कविता गुजराती भाषेत आहेत. विविध काव्यांची शिंपण या काव्यसंग्रहात आहे. तसेच विभाताईंच्या काव्यात विविध विषयावर अनेकानेक कविता गुजराती आणि मराठी मधे लिहिलेल्या आहेत.

या शिवाय वडोदरा शहराचे रेडिओ स्टेशन ९२.७ वरून त्यांनी किती तरी क्विझ मधे भाग घेऊन बक्षिसे मिळविले आहेत. अंताक्षरी मधे देखील अनेक बक्षिसे मिळविली आहेत.

त्यांनी आजपर्यंत गुजराती न्यूज पेपर मधे २५० आर्टिकलस लिहिली आहेत.

एवढ्यावरच न थांबता २००८ मध्ये कल्चरल फेस्टिवल अंतर्गत वडोदरा शहरात झालेल्या कार्यक्रमात थिएट्रिकल जज चे काम चोख बजावले. त्यात गुजरातच्या १५ वेगवेगळ्या कॉलेजच्या हजारो मुलामुलींनी भाग घेतला होता.

२०११ मध्ये वडोदराच्या सुभानपुरा समता वॉर्ड मध्ये एक कार्यक्रमात श्री. राजेश आयरे यांच्या हस्ते श्रेष्ठ नारीचा सन्मान देण्यात आला.

२०१० मध्ये स्वर्णीम गुजरात च्या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात विभाताईंनी स्वतः स्वरबद्ध केलेले गीत गायले. त्यासाठी त्यांचे मेयर बाळकृष्ण शुक्ल यांनी कौतुक केलं.




महिला बाल कल्याण विभागातर्फे सहा गरजु मुलींच्या लग्नाची जबाबदारी पार पडल्या बद्दल, ''सत्कार्येनु सन्मानपत्र'' प्राप्त झाले.

तसेच २०१८ साली ९१ व्या भारतीय मराठी साहित्य संमेलन वडोदरा येथे विभावरी ताईंच्या कवितेला सन्मानपत्र मिळाले.

२०२० मधे महाराष्ट्रातील संगमनेर येथे राज्यस्तरीय मराठी संमेलन भेटी लागी जीवा या कवितेला उत्कृष्ट कवितेचे पारितोषक आणि सन्मान चिन्ह मिळाले.

वेल विशर वूमेन्स क्लब च्या वतीने काव्य रसास्वाद उत्कृष्ट अभिव्यक्तीसाठी प्रथम क्रमांक मिळवून सन्मानित केले.

२०२१ मध्ये गणपतीपुळे आयोजित राज्यस्तरीय ९व्या मराठी काव्य संमेलनात मराठी कवितेचे उत्कृष्ट सन्मान पत्र आणि सन्मान चिन्ह मिळाले.

विभावरी ताईंना काव्याची, गीत, संगीत गायन अश्या विविध कलेतील अनेक बक्षिसे मिळाली आहे. विभावरी ताईंना ५ राज्यस्तरीय २ राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था भरती आणि प्रमाणित आहे, यांच्या कडून गुजरात राज्याची सिनियर लेडी प्रेसिडेंट आणि नॅशनल वुमेन्स गाईड सुद्धा आहे.

या संस्थेच्या सर्व पुरस्कार सलग दोन वर्ष मिळाले.

जसे... पर्यावरण मित्र पुरस्कार, राष्ट्रीय साहित्य रत्न पुरस्कार,राष्ट्रीय कर्तव्य दक्ष अधिकारी पुरस्कार,आदर्श महिला रणरागिणी पुरस्कार,राष्ट्रीय हिरकणी पुरस्कार असे अनेक राष्ट्रीय पुरस्कार तिला प्राप्त झाले आहेत.

विभाताई उत्कृष्ट सूत्र संचालन ही करत असते.

हिंदी, मराठी, गुजराती अशा तिन्ही भाषेवर प्रभुत्व आहे.

स्वतः काव्य लेखन करून त्याला संगीत देण्याचे काम आणि ते गाण्याचे काम सुद्धा विभावरी लेले ताई करतात.

त्यांचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. सतत कामात असणे तिला आवडतं. अशी ही विभावरी ताई मनाने हळुवार हसमुख चंचल आणि दुःखा पासून चार कोस दूर राहून... आनंदाचे क्षण वेचत असते. म्हणूनच ती मला हसणाऱ्या चांदण्यासाखीच वाटते.

तिच्या ओंजळीत फक्त कर्तृत्वाचे मोती, आणि चेहऱ्यावर हसू... हासरी ताराफुले... अशी ती भासते.

# ''माणुसकीची माई''

**ज्योतिर्मय साहित्य**

माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे यांची प्रेरणादायी यशोगाथा

छत्रपती संभाजीनगर शहरात अनेक सामाजिक उपक्रम होत असतात. परंतु काही कार्य अशी असतात जी केवळ उपक्रम नसतात; ती माणुसकीची जिवंत उदाहरणे असतात. अशाच एका संवेदनशील आणि समाजाभिमुख कार्यामागे उभे असलेले नाव म्हणजे मीरा रामदास वाघमारे.

निराधार आणि उपेक्षित वृद्धांसाठी ''माई वृद्धाश्रम'' या आश्रयस्थानाची स्थापना करून त्यांनी अनेकांच्या जीवनाला नवी दिशा दिली आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी काम करणारी ही महिला आज अनेकांसाठी प्रेरणेचा दीप बनली आहे.त्यांच्या कार्याची कहाणी समजून घेण्यासाठी घेतलेली ही एक विशेष मुलाखत.

प्रश्न : मीराताई, आपल्या सामाजिक कार्याची प्रेरणा नेमकी कुठून मिळाली?

मीरा वाघमारे : लहानपणापासूनच घरात सेवा आणि माणुसकीचे संस्कार होते. आई-वडील नेहमी सांगायचे की, ''ज्यांना आधार नाही त्यांना आधार देणे हीच खरी पूजा.'' शहरात अनेक वृद्ध आजी-आजोबा रस्त्यावर, मंदिराच्या ओट्यावर किंवा एकटे राहताना पाहिले की मन अस्वस्थ व्हायचे. त्याच वेदनेतून समाजासाठी काहीतरी करावे असे वाटू लागले.

प्रश्न : ''माई वृद्धाश्रम'' सुरू करण्यामागील कथा काय आहे?

मीरा वाघमारे : एकदा एका वृद्ध आजीला रस्त्यावर अत्यंत वाईट अवस्थेत पाहिले. त्यांना ना राहण्याची जागा होती, ना कोणी विचारपूस करणारे होते. त्या दिवशी मला खूप वेदना झाल्या. तेव्हा मनात विचार आला ''ज्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात कोणी नाही, त्यांच्यासाठी आपण काही करू शकत नाही का?''याच विचारातून माई वृद्धाश्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला.

प्रश्न : सुरुवातीला कोणत्या अडचणी आल्या?

मीरा वाघमारे : सुरुवातीला सर्वात मोठी अडचण आर्थिक होती. वृद्धांच्या राहण्याची, अन्नाची, औषधांची व्यवस्था करणे सोपे नव्हते. परंतु समाजातील काही संवेदनशील लोकांनी मदतीचा हात पुढे केला. कुणी अन्न दिले, कुणी औषधे दिली, तर कुणी आर्थिक मदत केली. त्या सहकार्यामुळे हा प्रवास शक्य झाला.

प्रश्न : माई वृद्धाश्रमात सध्या कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत?

मीरा वाघमारे : आमच्या वृद्धाश्रमात निराधार वृद्धांसाठी सुरक्षित निवास, रोजचे अन्न, औषधोपचार आणि मानसिक आधार दिला जातो. आम्ही त्यांना केवळ आसरा देत नाही, तर त्यांच्यासोबत कुटुंबासारखे नाते निर्माण करतो.आमच्या येथे



निवासाची व्यवस्था,पौष्टिक भोजन,वैद्यकीय तपासणी,योग व ध्यान,धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांमुळे वृद्धांचे जीवन आनंदी ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

प्रश्न : वृद्धाश्रमातील एखादा भावनिक अनुभव सांगाल का?

मीरा वाघमारे : अनेक अनुभव मनाला स्पर्श करून जातात. काही वृद्ध आजी-आजोबा सुरुवातीला खूप निराश असतात. त्यांना वाटते की आता आयुष्य संपले आहे. पण काही दिवसांनी ते हसताना दिसतात, गप्पा मारतात. कधी कधी ते म्हणतात''आम्हाला आमच्या मुलांनी विसरले, पण इथे आम्हाला खरे घर मिळाले.''

तो क्षण माझ्यासाठी सर्वात मोठा आनंद असतो.

प्रश्न : आपल्या संस्थेच्या इतर उपक्रमांविषयी सांगाल का?

मीरा वाघमारे : हो, आमची संस्था केवळ वृद्धांसाठीच नाही तर समाजातील विविध घटकांसाठी काम करते.

गरीब मुलांसाठी शिक्षण साहित्य वृक्षारोपण आणि पर्यावरण जनजागृती, महिलांसाठी शिवणकाम व कौशल्य प्रशिक्षण, गरीब कुटुंबांना दिवाळी आनंद उपक्रम, साक्षरता अभियान अशा अनेक समाजोपयोगी उपक्रमांद्वारे आम्ही समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करतो.

प्रश्न : महिलांसाठी केलेल्या उपक्रमांबद्दल थोडे सांगाल का?

मीरा वाघमारे : महिलांना स्वावलंबी बनवणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून आम्ही महिलांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवतो. शिवणकाम व फॅशन डिझाइनिंग, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, हस्तकला, लघुउद्योग मार्गदर्शन या प्रशिक्षणामुळे अनेक महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे.

प्रश्न : समाजातील तरुणांना आपण काय संदेश द्याल?

मीरा वाघमारे : आजच्या तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. त्यांनी समाजासाठी थोडा वेळ दिला तरी मोठा बदल घडू शकतो. वृद्धांचा सन्मान करा, पर्यावरण जपा आणि गरजू लोकांना मदतीचा हात द्या.माणुसकी जिवंत ठेवणे हीच खरी समाजसेवा आहे.

प्रश्न : पुढील काळासाठी आपली स्वप्ने काय आहेत?

मीरा वाघमारे : माझे स्वप्न आहे की, कोणताही वृद्ध रस्त्यावर किंवा एकाकी राहू नये. प्रत्येकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यासाठी माई वृद्धाश्रम अधिक मोठा आणि सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

माणुसकीच्या सेवेत उभे असलेले व्यक्तिमत्त्व मीरा वाघमारे यांची यशोगाथा ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही; ती समाजातील संवेदनशीलतेची जिवंत उदाहरण आहे. त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे की, सेवा करण्यासाठी मोठ्या पदाची गरज नसते गरज असते ती मोठ्या मनाची.

आज त्यांच्या मायेच्या सावलीत अनेक वृद्धांचे आयुष्य सुरक्षित झाले आहे. ज्या लोकांना स्वतःचे घर नव्हते, त्यांना त्यांनी घर दिले. ज्या लोकांना आधार नव्हता, त्यांना त्यांनी मायेचा हात दिला.खऱ्या अर्थाने पाहता ''माणुसकी जिथे जपली जाते, तिथेच समाज खऱ्या अर्थाने समृद्ध होतो.'' आणि ही माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे.

# ''देव'' हा अनुभूतीचा विषय आहे

**ज्योतिर्मय साहित्य**

देव'' हा अनुभूतीचा विषय आहे, शब्दांचा किंवा चर्चेचा नाही! ''समाधान टिकणे'', विचलित न होणे हे त्याचे स्वरूप आहे. अवतारकार्यात देवांचे कार्य सातत्याने कसे सुरू होते व स्मितहास्य ढळले नाही हे शिकण्यासारखे आहे.


गुरू तत्वाचे आगमन जीवनात झाले की ते शॉक ऍब्सरबर चे काम करतात. भार सद्गुरू स्वतः वर घेतात व जीवन मार्गी लावतातच. प्रत्येकाची चरित्रे पारायणासाठी तर असतातच पण त्यातून जो बोध होतो प्रत्येकाला तो ''सुबोध'' असतो. आंगठ्यांचे ठसे जर एकसारखे नाहीत तर सुख दुःख एकसारखे कसे असेल? पण सत्य हे सुख दुःखाच्या परे आहे व ते स्वच्छ सूर्यप्रकाशासारखे आहे. हे अनुभव सारखेच असतात, कुणी काहीही करो... सुखाची जाणीव एकच तशीच दुःखाची ही.



समाधानाची अवस्था तेव्हा येते जेव्हा उदासीनता जगण्याची नव्हे तर जीवनाबद्दल येते.

रामाचे, कृष्णाचे हास्य कधीही किंचीत ही कमी झाले नाही कारण ते सर्वज्ञ आहेत.

सत्य काय आहे हे ते जाणतात म्हणून बुद्धी स्थिर रहाते व हास्य कायमस्वरुपी वास करते. आंतरिक समाधान मिळते व ते कायम असते ही अतिशय मौल्यवान माहिती समजणे ही अनुभूती आहे. कशी आली कोठून आली कुणी कुणाला दिली हा वैयक्तिक प्रश्न आहे पण साखळी प्रक्रियेप्रमाणे एकाची दुसऱ्याला होऊन ती वाढीस लागते. सकारात्मक विचार हा याचा पाया आहे ज्यावर समाधानाची वास्तू पक्की होते.



अपर्णा परांजपे, पुणे मो. 95030 45495

गरीबी आहे म्हणून श्रीमंती जाणवते. सौंदर्य आहे म्हणून कुरुपता आहे. हे द्वैत एकाच अद्वैताचा अंश आहे कळले की मात्र विचार हळूहळू बदलतात व स्थिरही होऊ शकतात. भगवंत हृदयस्थ आहे

# पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात महिला दिन संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालय,कामठी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल तर प्रमुख वक्ता म्हणून डॉ. नीता वानखेडे विशेष अतिथी प्रा. विश्वनाथ वंजारी, महिला प्रतिनिधी म्हणून प्रा स्वाती निंबाळकर व प्रा रूपाली आढाऊ मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व विद्येची आराध्य देवता सरस्वती यांच्या प्रतिमेला मारल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्त्या डॉ नीता वानखेडे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्याने त्यांच्या कार्याचा गौरव करत स्त्रियांनी अधिक सक्षम होण्याचे आवाहन केले.

हा दिवस केवळ उत्सव नसून, स्त्री-पुरुष समानतेच्या संकल्पाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरला असल्याचे त्यांनी सांगितले

तर प्रमुख अतिथी प्रा विश्वनाथ वंजारी यांनी महिलांनी महिलांचा सन्मान करावा यावर भाष्य करत असताना समाजात महिलांना मिळत असलेल्या दुय्यम दर्जावर चिंता व्यक्त केली तर अध्यक्षीय भाषणातून प्रा डॉ सुधीर अग्रवाल यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाची पार्श्वभूमी सांगितली.हा दिवस महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय उपलब्धतेचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो,असे प्रतिपादन करताना महिलांचा प्रत्येक क्षेत्रात सन्मान करण्याची व महिलांप्रती समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापिका सोनल मालवीय यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सौरभ बनसोड यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर वकर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

विशेष सांस्कृतिक कार्यक्रम, सन्मान सोहळा आणि स्त्री सक्षमीकरणावर आधारित व्याख्याने आयोजित केली गेली होती, ज्यामध्ये विद्यार्थिनी व प्राध्यापिकांनी सक्रिय सहभाग नोंदवला




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559